**नियोजन (रोहयो) विभागाच्या प्रशासकीय खर्चाच्या देयकांकरिता नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**

शासन ज्ञापन क्रमांक : मग्रारो-२०२२/प्र.क्र.१६/रोहयो-७
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २८ जानेवारी, २०२२.

**वाचा :** १)महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा - २००५,
२)महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम (सुधारित) कायदा - २०१४,
३)भारत सरकार ग्रामीण विकास विभाग पत्र क्र. २८०१२/३/५६ नरेगा, दि ३० मार्च २००७,
४)नियोजन (रोहयो) विभाग शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.१२/रोहयो -७ दि.०४ जुन,२०१३,
५)वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२ दि. १७ एप्रिल, २०१५,
६) नियोजन (रोहयो) विभाग शासन निर्णयःआस्थाप-२०१७/प्र.क्र.१०२/मग्रारो-३. दि. १७ सप्टेंबर, २०१५

**प्रस्तावना :-**

२. केंद्र शासनाकडून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीकरिता ६% प्रशासकीय निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, आयुक्तालय नागपूर, उपआयुक्त (रोहयो), उपजिल्हाधिकारी (रोहयो), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) तसेच तालुका व पंचायत स्तरावरील कार्यालयात कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या मनुष्यबळाची मानधनाची देयके, योजनेच्या अंमलबजावणी करिता करण्यात येणा-या जाहिरात व प्रसिध्दीची देयके तसेच नियोजन (रोहयो) विभागाच्या दि. ०४ जुन,२०१३ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद करण्यात आलेल्या बाबींवरचा खर्च मंत्रालय स्तरावरुन करण्यात येतो.

३. सदरच्या देयकांवर **Passed for Payment** करण्याकरिता नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय स्तरावरील अधिका-यांना नियंत्रण अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याची बाव शासनाच्या विचाराधान होती.

**शासन ज्ञापन:-**

१. वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनीयम, भाग-२ दिनांक १७ एप्रिल, २०१५ चे परिशिष्ट वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग -पहिला, उपविभाग-एक, अ.क्र.१ नियम क्रमांक २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या विभाग प्रमुख या अधिकाराचा

वापर करुन उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये देयकांकरिता,सहाय्यक संचालक (रोहयो) मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून तसेच सहाय्यक लेखा अधिकारी (रोहयो) यांना आरहण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(डॉ. दिलीप पांढरपट्टे)**
**सचिव (जलसंधारण व रोहयो),**
**महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा-१), महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) प्रधान महालेखापाल (लेखा परिक्षा-२), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५) मा.राज्यपालांचे सचिव
६) मा.मुख्यमंत्रयाचे प्रधान सचिव
७) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
८) मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९) सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) आयुक्त, नरेगा, नागपूर
११) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सचिव (ले. व का.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई.
१५) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
१६) उपआयुक्त (रोहयो) सर्व
१७) उप जिल्हाधिकारी (रोहयो) सर्व
१८) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो) सर्व
१९) सहाय्यक संचालक नियोजन, (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) सहाय्यक लेखा अधिकारी, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) निवड नस्ती (रोहयो-७)